महाराष्ट्र शासन

# वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण इमारत,
१ ला माळा, गोधणी रोड, यवतमाळ-४४५००१

Ph.No.07232-245310 / 244689
E-mail- sg_yavatmal@rediffmail.com

## - जाहीरात -

(कंत्राटी पदांकरीता)

**वाचा - शासन निर्णय क्र.डब्ल्यूक्यूएम-२०१४/प्र.क्र.५९/पापु-१२, दिनांक २३/०२/२०१५**

**जाहीरात क्रमांक ०१/२०१८, दिनांक ०७/०५/२०१८**

शासन निर्णय क्र.डब्ल्यूक्यूएम-२०१४/प्र.क्र.५९/पापु-१२, दिनांक २३/०२/२०१५ नुसार जिल्हा सनियंत्रण कक्ष तसेच जिल्हा आणि उपविभागीय प्रयोगशाळा (ता.यवतमाळ, दारव्हा, पुसद, उमरखेड, राळेगाव, वणी) करीता आवश्यक असलेले मनुष्यबळ कंत्राटी पध्दतीने पदभरती करीता खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे.

### - प्रवर्ग निहाय आरक्षण -

| अ. क्र. | पदाचे नाव | एकूण रिक्त पदे | आरक्षणानुसार भरावयाची पदे | | | | | | | | | महिला समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज.-ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला | |
| १ | रसायनी | ३ | १ | ० | ० | | | | १ | ० | १ | ० |
| २ | अनुजेवीक तज्ञ | ५ | १ | १ | ० | | | | ० | ० | ३ | ० |

### - रिक्त पदांकरीता आवश्यक अर्हता -

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | रसायनी | ३ | बी.एस्सी. (रसायनशास्त्र),<br>MS-CIT उत्तीर्ण<br>प्राधान्य एम.एस्सी. (रसायनशास्त्र) | प्रयोगशाळेतील पाणी नमुने तपासणीचा/पाणी गुणवत्ता विषयक कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य | १२०००/- |
| २ | अनुजैविक तज्ञ | ५ | बी.एस्सी. (सूक्ष्मजीवशास्त्र),<br>MS-CIT उत्तीर्ण<br>प्राधान्य एम.एस्सी. (सूक्ष्मजीवशास्त्र) | | १२०००/- |

**<u>महत्वाच्या सूचना</u> -**

०१. सदरचे पदाकरीता शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांची प्राप्त अर्जानुसार लेखी परिक्षा/चाळणी परिक्षा घेण्यात येईल. सदर बहुपर्यायी वस्तुनिष्ठ लेखी परिक्षा/चाळणी परिक्षा एकूण ५० गुणांची राहील. लेखी परिक्षेमध्ये एकूण ५० प्रश्नांकरीता १ तासाचा कालावधी राहील. सदर चाचणीत सर्वोच्च गुण प्राप्त करणाऱ्या १:१० उमेदवारांना मुलाखतीसाठी आमंत्रीत करण्यात येईल. मुलाखतीमधील प्राप्त गुणाक्रमानुसार उमेदवारांची निवड यादी (Selection List) व प्रतिक्षा यादी (Waiting List) करण्यात येईल. सर्व पदांकरीता १:५ या प्रमाणे प्रतिक्षायादी (Waiting List) तयार करण्यात येईल.

०२. **सदर पदांकरीता अर्हताप्राप्त संवर्गनिहाय / आरक्षणनिहाय १:१० च्या प्रमाणात किंवा त्यापेक्षा कमी अर्ज प्राप्त झाल्यास पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.डब्ल्यूक्यूएम-२०१४/प्र.क्र.५९/पापु-१२, दिनांक १५/०५/२०१५ नुसार उमेदवारांची लेखी/चाळणी परिक्षा न घेता थेट मुलाखत घेण्यात येईल.**

०३. **अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक ०६/०६/२०१८ असून कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते सायं.५.४५ वाजेपर्यंत अर्ज स्विकारल्या जातील.**

०४. **अर्ज केवळ पोस्टाने/कूरीअरद्वारे किंवा कार्यालयात प्रत्यक्षरित्या स्विकारल्या जातील. ऑनलाईनद्वारे प्राप्त अर्ज स्विकारण्यात येणार नाही, याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

०५. जाहिरातीच्या अंतिम दिनांकानंतर मिळालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. पोष्ट अथवा कुरीअर मार्फत विलंब झाल्यास तो अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतला जाणार नाही. उमेदवारांच्या अर्जावरील दिनांक अथवा पोष्टाच्या शिक्क्यावरील दिनांक याचा विचार न करता अर्ज या कार्यालयास प्राप्त झाल्याचा दिनांक लक्षात घेवूनच अर्ज विहित मुदतीत प्राप्त झाला किंवा नाही यावर निर्णय घेण्यात येईल. या सर्व बाबींचा विचार करुन उमेदवारांनी आपले अर्ज पाठविण्याची काळजी घ्यावी.

०६. विहित पात्रता धारण न करणाऱ्यांचे अर्ज, अपूर्ण व चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता, इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या उमेदवाराचे स्वसाक्षांकीत प्रती नसलेले अर्ज व कुठल्याही प्रकारचा दबावतंत्र वापराचा प्रयत्न करणाऱ्यांचे अर्ज अपात्र समजण्यात येतील.

०७. **<u>लिफाफ्यावर ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नाव व ज्या प्रवर्गासाठी अर्ज करावयाचा आहे त्या प्रवर्गाचा स्पष्ट उल्लेख करावा.</u>**

०८. अर्ज स्विकारण्याचा पत्ता - **वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, १ ला माळा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण इमारत, अँग्लो हिंदी हायस्कूल समोर, गोधणी रोड, यवतमाळ-४४५००१**

०९. वयोमर्यादा - जाहिरातीनुसार अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकास उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.)

१०. सदर कंत्राटी पदे केवळ ११ (६+५) महिन्यांसाठी करारनामा तत्त्वावर भरती करावयाची असल्याने महिलांव्यतिरिक्त इतरांना समांतर आरक्षण लागू होणार नाही.

११. पदाच्या अर्जासाठी संपूर्ण जाहिरात, अर्जाचा नमुना, महत्वाच्या सूचना तसेच अटी व शर्ती जिल्हा परिषद, यवतमाळचे <u>http://zpyavatmal.gov.in</u> या संकेतस्थळ (website) वर **आणि** जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळचे <u>http://yavatmal.nic.in</u> या संकेतस्थळ (website) वर उपलब्ध आहेत. शिवाय या कार्यालयामध्ये सुध्दा अर्जाचा नमुना उपलब्ध आहे.

१२. तसेच पात्र व अपात्र उमेदवारांची यादी, प्रसिध्द केलेल्या पात्र/अपात्र यादीवर आक्षेप मागवून अंतिम पात्र व अपात्र उमेदवारांची यादी, लेखी परिक्षा/मुलाखतीचे प्रवेशपत्र, परिक्षेचा निकाल, व अंतिम निवड/प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणे इत्यादीबाबत माहिती वेळोवेळी <u>http://zpyavatmal.gov.in</u> **आणि** <u>http://yavatmal.nic.in</u> या संकेतस्थळावर तसेच कार्यालयाचे सूचनाफलकावर प्रसिध्द करण्यात येईल. तेव्हा भरती प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहावी. या संदर्भात स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३. प्राप्त अर्जांची छाननी प्रक्रीया करुन पात्र उमेदवारांना लेखी परिक्षा/मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल. उमेदवारांना लेखी परिक्षा/मुलाखतीसाठी स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

१४. सदर पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या व इतर अनुषंगिक माहिती शासन निर्णय क्र.डब्ल्यूक्यूएम-२०१४/प्र.क्र.५९/पापु-१२, दिनांक २३/०२/२०१५ मध्ये उपलब्ध आहे.